माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम कॉजवे.

□ *कारवाँ* या चित्रपटात जितेंद्रच्या मित्राची व खलनायकाची भूमिका करणाऱ्या कलाकारांचे नाव काय?

— मित्राची भूमिका करणाऱ्या कलाकाराचे नाव रवींद्र कपूर. खलनायकाची भूमिका करणाऱ्या कलाकाराचे नाव किशन मेहता.

□ 'मेरी जाँ मैंने कहाँ...' व 'मुत्तुकोडी कव्वाडी...' ही आर. डी. बर्मनने गायलेली गाणी कोणत्या चित्रपटातील?

— 'मेरी जाँ मैंने कहाँ...' हे गाणे *द ट्रेन* या चित्रपटातील. 'मुत्तुकोडी...' हे गाणे आर. डी. बर्मनने गायलेले नव्हते. त्याच्या संगीतात मेहमूदने गायले होते. *दो फूल* या चित्रपटात.

□ 'अपनो को जो ठुकरायेगा...' हे रफीने गायलेले गाणे कोणत्या चित्रपटातील? हा चित्रपट केव्हा प्रदर्शित झाला होता? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

— हे गाणे १९८०च्या *जुदाई* या चित्रपटात होते. अशोककुमार, जितेंद्र, रेखा, सचिन, अरुण गोविल, ए. के. हंगल, असित सेन, आशा सचदेव, अरुणा ईराणी, शोमा आनंद, देवेन वर्मा हे या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. गीतकार आनंद बक्षी, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता ए. सुब्बाराव, दिग्दर्शक टी. रामाराव.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ जॉय मुखर्जीचे *आग और दाग*, *एहसान*, *इन्स्पेक्टर*, *मुजरिम*, *पुरस्कार* व *लव्ह इन बॉम्बे* हे चित्रपट केव्हा प्रदर्शित झाले होते? या चित्रपटातील अन्य कलाकार व संगीतकार कोण?

— *आग और दाग* १९६०मध्ये आला होता. कोमल (शत्रुघ्न सिन्हांची पत्नी पूनम), जयंत, मदनपुरी, आय. एस. जोहर, हेलन, भगवानदादा, सुधीर. झेब रहमान, राजन हकसर, शेट्टी, कुंदन या चित्रपटातील अन्य कलाकार होते. संगीतकार एन. दत्ता. *एहसान* ही १९७०मध्येच प्रदर्शित झाला होता. अंजना (आताची अंजना मुमताज), राजेंद्रनाथ, बॉबी, हेलन, अरुणा ईराणी, के.एन.सिंह, मदनपुरी, सुलोचना चटर्जी, जॉनी व्हिस्की, बिपीन गुप्ता, शबनम, आझाद, रेणू, सुंदर, टुनटुन, शेरी, राजन कपूर या चित्रपटातील अन्य कलाकार होते. संगीतकार आर. डी. बर्मन, *इन्स्पेक्टर* १९७०मध्ये पडद्यावर आला होता. अलका, हेलन, झेब रहमान, पारो या चित्रपटातील अन्य कलाकार होते. संगीतकार एन. दत्ता, *मुजरिम* ही १९७०मध्येच पडद्यावर आला होता. कुमुद छुगानी, देवकुमार, जयंत, निशी, जयश्री टी. या चित्रपटातील अन्य कलाकार होते. संगीतकार सोनिक, ओमी, *पुरस्कार* ही १९७०मध्येच पडद्यावर आला होता. सपना, हेलन, फरियाल, आय. एस. जोहर, अभी भट्टाचार्य, बिपीन गुप्ता, रामकुमार, फरिदा जलाल महेंद्र या चित्रपटातील अन्य कलाकार होते. संगीतकार आर. डी. बर्मन. *लव्ह इन बॉम्बे*, १९७५मध्ये पडद्यावर आला होता. वहिदा रहमान या चित्रपटाची नायिका होती. संगीतकार शंकर-जयकिशन.

□ *श्री ४२०*मधील 'प्यार हुआ इकरार हुआ...' या गाण्यात नरगिस तीन मुलांच्याकडे अंगुलीनिर्देश करते. ती मुले कोण?

— रणधीर, ऋषी कपूर व राज कपूरची कन्या रिमा.

अविनाश मोने, मुंबई.

□ जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *सामना.*

□ निळू फुलेनी भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *एक गाव बारा भानगडी.*

श्रीधर साठे, पुणे.

□ वसंत पवार यांनी संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *जय भीम*. हा चित्रपट हिंदी होता. त्यांचा पहिला मराठी चित्रपट *पठ्ठे बापूराव*.

□ अशोक सराफचा पहिला चित्रपट कोणता?

— *दोन्ही घरचा पाहुणा.*

संतोष चंद्रशेखर हालकुडे, कुर्डुवाडी.

□ अजित व प्रेमनाथ यांनी कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?

— *आपबीती*, *जीवनसाथी*, *मेहरबानी*, *बेकसूर*, *दामन*, *ढोलक*, *सैय्या*, *सरकार*, *आनंदमठ*, *अन्नदाता*, *मोती महल*, *तरंग*, *मान*, *नास्तिक*, *सम्राट*, *बारादरी*, *मरीन ड्राईव्ह*, *नकाब*, *शाहजादा*, *तिरंदाज*, *आनबान*, *दुर्गेश नंदिनी*, *हलाकू*, *इन्साफ*, *तनखा*, *२६ जनवरी*, *बडा भाई*, *कितना बदल गया इन्सान*, *मिस बॉम्बे*, *मीलन*, *मेहंदी*, *चार दिल चार राहे*, *दो गुंडे*, *गेस्ट हाऊस*, *मा के आंसू*, *बारात*, *दिल्ली जंक्शन*, *मैं और मेरा भाई*, *ऑपेरा हाऊस*, *गर्ल्स होस्टेल*, *नीली आँखे*, *टॉवर हाऊस*, *काबलीखान*, *शिकारी*, *आवारा बादल*, *बॉम्बे रेसकोर्स*, *मैं हूं अल्लादिन*, *नवजवान*, *अरेबियन नाईटस्*, *दो दुश्मन*, *दिलरुबा*, *सरदार*, *शमशीर*, *किलर्स* या चित्रपटांत अजित नायकाच्या भूमिकेत चमकला.

प्रेमनाथ-अजित *बरसात*, *बादल*, *बुझदिल*, *सगाई*, *नवजवान*, *शोखियाँ*, *पर्बत*, *साकी औरत*, *दर्दे दिल*, *मेहमान*, *शगुफा*, *आबे हयात*, *चंगेज खान*, *समंदर*, *गोलकुंडा का कैदी*, *२४ घंटे*, *बस कंडक्टर*, *४० दिन*, *जागिर*, *डॉ. शैतान*, *गॅम्बलर*, *कातिल*, *सिकंदर-ए-आजम*, *रुस्तुम सोहराब*, *शेर अफगाण*, *मेरा भाई मेरा दुश्मन* या चित्रपटात नायकाच्या भूमिकेत चमकले.

मारुती गणपत कोळी, नवघर.

□ रीना रॉयचा पहिला चित्रपट?

— *जरूरत.*

□ नसीरुद्दीन शहाचा पहिला चित्रपट?

— *निशांत.*

□ माधुरी दीक्षित व करिश्मा कपूरचा पहिला नायक कोण?

— माधुरीचा पहिला नायक तापस पाल. चित्रपट *अबोध*. करिश्माचा पहिला नायक हरीश. चित्रपट *प्रेमकैदी*. ●

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ क्रिकेट हा खेळ आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटात पडद्यावर आला आहे?



*ऑल राऊंडर*मध्ये विनोद मेहरा व कुमार गौरव

— मा. विनायकनी १९४३ च्या *चिमुकला संसार* या चित्रपटात क्रिकेटचा खेळ सर्वात प्रथम पडद्यावर आणला. हिंदीत १९५९च्या *लव मॅरेज* या चित्रपटात हा खेळ सर्वात प्रथम पडद्यावर आला. त्यानंतर *क्रिकेटर*, *गोलमाल*, *ऑल राऊंडर*, *हिप हिप हुर्रे*, *लगान* या चित्रपटात.